# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०६/०७/२०१६.

**१) घरातुन सोन्या—चांदिच्या दागिण्यांसह नगदी पैश्याची चोरी. :—**

**अ)** दिनांक ०५/०७/०१६ रोजी १२.०० ते १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नरेंद्र रामचंद्र मुलकलवार वय ४५ वर्ष, रा. लक्ष्मी नगर तुळजाभवानी मंदिर जवळ खोकरला यांची पत्नी ही घराला ताला लावुन बाहेर गेली होती. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन त्यांच्या राहाते घराचा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश केला व गोदरेज आलमारी मध्ये ठेवलेले ३.५ तोळयाची चपलाकंठी, १० ग्रॅम सोन्याचा गोप, ३ ग्रॅम सोन्याची अंगठी, ३० ग्रॅम चांदीचे कळे व नगदी १५,०००/—रू. असा एकुण कि. ६९,५००/—रू. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,३८० भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०५/०७/२०१६ रोजी १०.०० ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी धनराज बाबुराव वाघाये वय ४७ वर्ष, रा. न्यु म्हाळा कॉलनी क्वॉर्टर नं. १७ खात रोड भंडारा हे घराला ताला लावुन बाहेर गेले होते. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन त्यांच्या राहते घराचा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश केला व गोदरेज आलमारी मध्ये ठेवलेला ३ तोळयाचा सोन्याचा मंगळसुत्र, १५ ग्रॅम सोन्याची चपलाकंटी, ५ ग्रॅम सोन्याची पांचाली, १ ग्रॅम सोन्याची नथ, १ ग्रॅम सोन्याची काळया मन्याची गरसोली, ३ ग्रॅम सोन्याचे टॉप्स, चांदीचा करदोळा व नगदी १८००/—रू. असा एकुण कि. ६८,०००/—रू. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,३८० भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घराच्या हिस्से बटवा—यावरून भांडण व मारहान करून गर्भपात होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०८/०६/२०१६ रोजी १७.०० ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी विवाहित महिला वय २६ वर्ष व सातही आरोपी हे एकाच कुटंबातील आहेत व एकाच घरी वेगवेगळया खंडात राहत आहेत. फिर्यादी ही आरोपी क्र. १ ची जावु असुन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीच्या पती व सासऱ्या सोबत शेती व घराच्या हीस्या बटवाऱ्या वरून शिवीगाळ केली व फिर्यादी ही गर्भवती असल्याचे माहीत असतांना सुध्दा आरोपी क्र. १ ने जर्मनी गंजाने तिच्या पोटावर व गालावर थापडबुक्यानी आपखुशीने दुखापत करुन फिर्यादीचे गर्भपात होण्यास कारणीभुत झाली व इतर आरोपीतांनी फिर्यादी, तिचे पती व सास—याला शिवीगाळ करुन ढकलढुकल केली. असे फिर्यादीने दिनांक ०५/०७/२०१६ रोजी पो.स्टे. ला येवुन तक्रार दिल्याने व एम.एल.सी. रिपोर्ट व डॉ. अहवाल व चौकशी वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३१२,५०४,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. गोंडगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) ट्रकच्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यु व एक जखमी. :–**

दिनांक ०५/०७/२०१६ चे १०.०० वा. दरम्यान दर्शना देवचंद सानेकर रा. भंडारा ही भंडारा कडुन बेरोडी कडे तिची मैत्रिण वर्षा गणविर हिच्यासह एक्टीवा गाडी क्र. एमएच ३६ एम ११२० ने जात असतांना आरोपी ट्रक क्र. जीजे ३ एटी ४३२९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरघाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन दर्शना देवचंद सानेकर हिच्या गाडीला भिलेवाडा फाटयाजवळ धडक मारुन तिच्या मरणास व तिच्या मैत्रिनीला जखमी करण्यास कारणीभुत झाला व अपघाताची माहीती न देता पळुन गेला. असे फिर्यादी उमरीस देवराव सानेकर वय ३३ वर्ष, रा. दत्तात्रय नगर तुमसर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी. :–**

दिनांक ०५/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. गोबरवाही व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०२ लिटर हातभट्टी दारू कि. १००/–रू. व ७२० मिली. देशी दारू कि. २००/–रू. असा एकुण कि. ३००/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.